**MHKO100006502022**

## नियमित दिवाणी दावा क्र. १६९/२०२२ निशाणी क्र. ४६ वरील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी जादा मुद्दे काढण्याकरीता दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, दाव्यामधील कथने व कैफियतीमधील कथन विचारात घेवून मे. न्यायालयाने दिनांक ०१/०९/२०२३ रोजी मुद्दे काढले आहेत. वादी यांचे दाव्यामधील कथनावरून सदर मुद्देमध्ये बदल करणे व प्रतिवादी यांचे कैफियतमधील कथनावरून जादा मुद्दे काढणे आवश्यक आहे. तरी पुढीलप्रमाणे जादा मुद्दे काढणे आवश्यक आहे.

१. वादी हे सिद्ध करतात का, दावा मिळकतीचे वर्णन दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ३ प्रमाणे पुरेसे आहे.

२. वादी हे सिद्ध करतात का, ते दावा मिळकतीचे (adverse possession) गैरहक्काने मालक झालेल आहेत.

३. वादी हे सिद्ध करतात का, दावेची आकारणी योग्य करून त्यावर आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरलेले आहे.

तसेच मुद्दा क्र. २, ३ व ५ रद्द करावेत अशी विनंती केली आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

**२.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे निशाणी ४७ वर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, मे. कोर्टांनी दाव्यात आवश्यक ते मुद्दे काढले आहेत. वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन कायदेशीर व बरोबर केले आहे. दावा मिळकत समजणेसाठी कच्चा हात नकाशा दाव्यासोबत जोडला आहे. वादी यांनी दावा

मिळकतीची आकारणी योग्य केली आहे. प्रतिवादी यांनी अर्जात सुचित केलेले मुद्दे दावेस विसंगत आहेत व दाव्यास निगडीत नाहीत. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**३.** अर्ज व त्यावर दाखल केलेले म्हणणे वाचले. उभयपक्षाच्या विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**४.** अभिलेखावरील कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा ते दावा मिळकतीचे मालक झाले आहेत असे जाहीर होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी कथन करत असल्याप्रमाणे मुद्दे काढल्यास वादीचे काही नुकसान होणार नाही, उलट वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात येण्यासाठी मदत होणार आहे. सदर मुद्दे हे कायदेशीर असल्याने ते काढणे योग्य होईल.

**५.** तसेच मुद्दा क्र. २, ३ व ५ रद्द करावेत असे कथन केले आहे. मुद्दा क्र. ५ हा प्रतिवादी यांनी सुचविलेल्या मुद्दा क्र. १ शी सुसंगत आहे, त्यामुळे तो रद्द करत नाही. तसेच मुद्दा क्र. २ व ३ हे वादी यांच्या वाद पत्रातील कथनानुसार निश्चीत केले आहेत. ते सिद्ध करण्याची जबाबदारी वादी यांची आहे. त्यामुळे ते मुद्दे दाव्यातील वाद निश्चीत करण्यासाठी गरजेचे आहेत. त्यानुसार मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. निशाणी २७ वर खालीलप्रमाणे जादा मुद्दे निश्चीत करण्यात येतात.

   ८. वादी हे सिद्ध करतात का, ते दावा मिळकतीचे (adverse possession) गैरहक्काने मालक झालेले आहेत.?

९. वादी हे सिद्ध करतात का, दावेची आकारणी योग्य करून त्यावर आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरलेले आहे?

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.03.28 11:10:50 +0530

ठिकाणः- गडहिंग्लज
दिनांक - २७/०३/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज